# आयुष्याचं इंद्रधनुष्य स्वदेशात राहूनही सुंदर करता येते

## अंजली शैलेश यांची भावना

प्रतिनिधी, पुणे

**आयुष्याचं इंद्रधनुष्य** स्वदेशात राहूनही सुंदर करता येते अशी भावना 'पोटली- एक गल्फी सेल्फी' पुस्तकाच्या लेखिका अंजली शैलेश यांनी व्यक्त केली. परदेशातून येऊनही आम्ही खूश आहोत हे लोकांपर्यंत पोहोचविण्यासाठी हे लेखन केले असल्याचे त्यांनी सांगितले.

बुकगंगातर्फे अंजली शैलेश यांच्या 'पोटली- एक गल्फी सेल्फी' या पुस्तकाचे प्रकाशन सामाजिक कार्यकर्त्या सिंधूताई सपकाळ यांच्या हस्ते झाले. प्रसिद्ध निवेदक सुधीर गाडगीळ आणि मंदार जोगळेकर या वेळी उपस्थित होते. सर्वसाधारणपणे परदेशात गेल्यानंतर परत न येण्याची मानसिकता दिसते. त्या पार्श्वभूमीवर अंजली आणि शैलेश यांनी मायदेशी परतण्याचा निर्णय अमलात आणला. त्यामुळे त्यांची भूमिका वाचण्यासाठी मी उत्सुक होतो. अंजली यांनी केवळ वर्णनात्मक स्वरूप न करता मनातील अनेक गोष्टी लिहिल्या आहेत, असे सुधीर गाडगीळ यांनी सांगितले. पती शैलेश यांचे परदेशी जाण्याचे निश्चित असल्याने तेथे जाऊन मिळतील त्या नोकऱ्या करून राहायचे असे ठरवले होते. तीन किंवा पाच वर्षांत परत येऊ असे नियोजन होते, मात्र १५ वर्षे कशी गेली ते कळले नाही. नंतर मात्र आम्ही नोकऱ्यांचे राजीनामे देऊन मायदेशी परतलो, असे सांगून अंजली शैलेश म्हणाल्या, परदेशात आधी गेलेल्या भारतीयांनी सुरुवातीला थोडे दूर ठेवले. नंतर मात्र, त्यांच्यामध्ये मिसळून घेतले. महाराष्ट्र मंडळात आलेल्या प्रत्येक कलाकाराचा अनुभव चांगला आला.

लोकसत्ता
Sat, 01 July 2017
epaper.loksatta.com/c/20253250